रयत शिक्षण संस्थेचे,

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा, जि. पालघर

# भाषा संवर्धन पंधरवडा व्याख्यान अहवाल

२०१८-१९

महाविद्यालयीन विद्यार्थ्यात मराठी भाषा संवर्धनविषयक दृष्टिकोन विकसित व्हावा. जागतिकीकरणात मराठी भाषा टिकावी. त्यातून उत्तमाउत्तम साहित्य निर्मिती होण्यास साह्य व्हावे या हेतूने महाविद्यालयात १२जानेवारी २०१९ भाषा संवर्धनासाठीच्या उपयोजना या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख वक्त्या म्हणून प्रा. डॉ. प्रज्ञा कुलकर्णी (मराठी विभागप्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जव्हार) ह्या उपस्थित राहिल्या. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विविध शाखेचे ८८ विद्यार्थी उपस्थित होते.

- वर्ग : प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष मराठी विषयाचे विद्यार्थी
- **सहभागी विद्यार्थी व श्रोतृगण : ८८**
- **उद्देश :**

    १. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत भाषा संवर्धन विषयक दृष्टिकोन विकसित करणे.

    २. मातृभाषेचे महत्त्व पटवू देणे.

    ३. मानवी विकासातील मातृभाषेचे महत्त्व अधोरेखित करणे.

    ४. भाषा व बोली यातील भेद समजून देणे.

    ५. भाषाविषयक श्रेष्ठ कनिष्ठतेच्या संकल्पनातील वास्तव मांडणे.

    ६. भाषा टिकविण्यासाठी करता येण्यासारख्या छोट्या छोट्या उपक्रमांचा परिचय करून देणे.

- **निष्कर्ष :**

    १. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत भाषा संवर्धन विषयक दृष्टिकोन विकसित करण्यास मदत झाली.

    २. मातृभाषेचे महत्त्व पटवू देता आले.

    ३. भाषा व बोली यातील भेद याभेद, श्रेष्ठ कनिष्ठतेच्या संकल्पना समजून देता आल्या.

    ४. भाषा टिकविण्यासाठी करता येण्यासारख्या छोट्या छोट्या उपक्रमांचा परिचय करून देता आला.

प्रा.डॉ. मगदूम बी. एम

(मराठी विभागप्रमुख)

Art's Science & Com. College Mokhada

प्राचार्य
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
मोखाडा, जि. पालघर

*Rayat Shikshan Sanstha's*

**Arts, Science and Commerce College, Mokhada, Dist. Palghar**

***Marathi Bhasha Savnardhan Pandharwada***

**2018-2019**













Art's Science & Com. College ★ Mokhada ★

# भाषा संवर्धन पंधरवडा व्याख्यान क्षणचित्रे













Art's Science & Com. College ★ Mokhada ★

पुढारी

# साहित्याचा विद्यार्थी हा जागल्या

## प्राचार्य कैलास कळकटे यांचे मोखाड्यात प्रतिपादन

**मोखाडा : प्रतिनिधी**

वर्तमान स्थिती आपल्या भोवतीच्या अनेक गोष्टी जगतिकीकरणाच्या रेट्याने, बदलत्या समाज जीवनामुळे बदलत आहेत. अशा स्थितीत आपल्या परंपरा, लोकभाषा, लोकसाहित्य याची जपणूक करण्याची जबाबदारी ही वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांवर आहे. वाङ्मयाचा विद्यार्थी केवळ साहित्य, भाषेचा अभ्यास करत नाही तर तो बदलत्या समाज जीवनाचा निरीक्षण असतो. त्यामुळेच सहित्याचा विद्यार्थी हा जागल्या आहे. असे मत कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रा. कैलास कळकटे यांनी व्यक्त केले. ते आज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

आज आपल्याकडील अनेक गोष्टी जुन्या आहेत, म्हणून त्या आपल्याला नकोश्या झाल्या आहेत. पण हयाच




गोष्टी आपण जपून ठेवायला हव्यात. जर आपण जपून ठेवल्या नाहीत, तर त्या नष्ट होतील, म्हणून त्या जपा. त्यासाठी हाती असलेली समाज माध्यमे वापरा. केवळ उत्तम गुण मिळाल्याने सर्वगोष्टी सफल झाल्या असे म्हणता येणार नाही असेही मत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. पी. जे. शिंदे होते त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात भोवतालाचे निरीक्षण, वाचन आणि लेखन ही आत्मभानाची प्रक्रिया आहे. ज्याला आत्मभान आले अशी व्यक्ती साऱ्यांच्या अनुभवाकडे डोळसपणे पहाते. विद्यार्थ्यांना आत्मभान येणे आवश्यक असल्याचे सांगितले. या महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळ हे नेहमीच अभिनव उपक्रम राबवून विद्यार्थ्यांची साहित्यविषयक अभिरुची घडविण्याचा प्रयत्न करत असतो. याचाच एक भाग म्हणजे मराठी वाङ्मय मंडळ होय हे होय. या कार्यक्रमाच्या आरंभी प्रा. कैलास कळकटे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या मोखाडा परिसरातील कृषीगीताच्या भितिपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी वाङ्मय मंडळाची कार्यकारिणी निवडण्यात आली. या कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन प्रा. डॉ. मगदूम बी. एम. यांनी केले तर आभार योगेश वाजे यांनी मानले.

Virar-Dahanu Shuttle Edition
22 Sep, 2019 Page No. 3
Powered by : erelego.com

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
★ मोखाडा ★